**“ऑगस्ट २०१६” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(अ) शासन निर्णय / अधिसूचना**

- मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ या वर्षाकरिता फेलोंच्या गुणवत्ता यादीनुसार अधिकचे १० फेलो निवडण्यास दिनांक २४ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

- फौजदारी कार्यवाहीच्या तुलनेत विभागीय चौकशी करण्याबाबत तसेच चौकशी अधिकारी यांच्याकडे दोषारोप पत्रातील दस्तऐवज पाठविण्याबाबतचे दिनांक २३ ऑगस्ट २०१६ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

- दिनांक २२ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये आस्थापना मंडळ क्रमांक-१ ची पुनर्रचना करण्यात आली आहे.

- भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजुरी देणाऱ्या सक्षम प्राधिकारी निश्चित करताना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेण्या विचारात घेण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २२ ऑगस्ट २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

- राज्यातील राज्य शासकीय / निमशासकीय / महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे, त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्यानुषंगाने प्रभावी उपाययोजना सूचविण्यासाठी मा.मंत्री, वित्त यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीस अहवाल सादर करण्यास दिनांक २० ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- दिनांक ९ ऑगस्ट २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या / पदस्थापना संदर्भात सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- मंत्रालयीन सेवेतील अवर सचिव, वरिष्ठ स्वीय सहायक, कक्ष अधिकारी व निवडश्रेणी लघुलेखक या संवर्गातील पदावर पदोन्नतीसाठी निवडसूची तयार करण्यासाठी विभागीय पदोन्नती समिती क्रमांक-१ ची पुनर्रचना करण्यात आली आहे.

- भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या / पदस्थापना याबाबत शिफारस करण्यासाठी दिनांक ६ ऑगस्ट २०१६ च्या शासन निणर्सयान्वये सुधारित नागरी सेवा मंडळ स्थापन करण्यात आले आहे.

- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेला जून ते नोव्हेंबर २०१६ या सहा महिन्यांकरिता योजनेतर खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क) वित्त विभागाच्या दिनांक २० एप्रिल २०१६ च्या परिपत्रकानुसार एकूण अर्थसंकल्पिय अनुदानाच्या ८०% च्या मर्यादेत, वेतनेतर करिता अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या सहायक अनुदानातून रु.३८०.०० लाख (अक्षरी रुपये तीनशे ऐंशी लाख फक्त ) इतके सहायक अनुदान (दुसरा हप्ता) दिनांक २ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे.

- मराठवाडा प्रशासकीय विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण, औरंगाबाद या संस्थेला जून ते नोव्हेंबर २०१६ या सहा महिन्यांकरता योजनेतर (वेतनेतर व वेतने) खर्चासाठी वित्त विभागाच्या दिनांक २० एप्रिल २०१६ च्या परिपत्रकानुसार एकूण अर्थसंकल्पिय अनुदानाच्या ८०% च्या मर्यादेत, अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या सहायक अनुदानातून विकास प्रशिक्षण व तद्नुषंगाने खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन या खर्चासाठी एकूण रु.७५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर लाख फक्त) इतके योजनेतर सहायक अनुदान (दुसरा हप्ता) दिनांक २ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे.

- डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला जून ते नोव्हेंबर २०१६ या सहा महिन्यांकरता योजनेतर (वेतनेतर व वेतने ) खर्चासाठी वित्त विभागाच्या दिनांक २० एप्रिल २०१६ च्या परिपत्रकानुसार एकूण अर्थसंकल्पिय अनुदानाच्या ८०% च्या मयादेत, अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या सहायक अनुदानातून विकास प्रशिक्षण व तद्नुषंगाने खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन या खर्चासाठी एकूण रु.९०,८४,०००/- (रुपये नव्वद लाख चौ-याऐंशी हजार फक्त) इतके योजनेतर सहायक अनुदान (दुसरा हप्ता ) दिनांक २ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे.

**(ब) <u>प्रशिक्षण</u>**

- "मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१६" या परीक्षेला बसलेल्या ३३८ उमेदवारांचा निकाल दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला.

- दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार बदलीने विभागात / कार्यालयात आलेल्या वर्ग-१ ते वर्ग-३ च्या अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी १-३ दिवसांचे बदलीनंतरचे प्रशिक्षण (After transfer training) देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- "कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१६" च्या प्रशिक्षण वर्गाचे दिनांक १९ सप्टेंबर २०१६ ते २६ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या वर्गात १४६ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

- १६ परिविक्षाधीन कक्ष अधिकाऱ्यांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत टप्पा क्रमांक-३ व ४ करिता दिनांक १६ ऑगस्ट २०१६ पासून वनामती, नागपूर येथे पाठविण्यात आले आहे.

- "सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१६" ही परीक्षा दिनांक २ व ३ सप्टेंबर २०१६ रोजी विक्रीकर भवन, माझगांव येथे आयोजित करण्यात आली आहे.

**(क) <u>पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची</u>**

- २० अवर सचिवांना उपसचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. १११ लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी (गट-ब अराजपत्रित) पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. १ निम्नश्रेणी लघुलेखकाला उच्चश्रेणी लघुलेखक पदी पदोन्नती देण्यात आली आहे.

- मंत्रालयीन अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २००३ ते १ जानेवारी २०११ रोजीची स्थिती दर्शविणाऱ्या सुधारित ज्येष्ठतासूच्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

(ड) **<u>बदल्या / पदस्थापना</u>**

- सहायक कक्ष अधिकारी, निम्नश्रेणी लघुलेखक, लिपिक-टंकलेखक या संवर्गातील अनुक्रमे ३, १, २ अशा ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा सचिव, राज्य निवडणूक आयोग यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने सुपूर्द करण्यात आल्या आहेत.

- "सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय परीक्षा २०१५" मधील शिफारसप्राप्त २ उमेदवारांचे मंत्रालयीन विभागात नियतवाटप करण्यात आले.

- भारतीय प्रशासन सेवेतील ६४ अधिकाऱ्यांच्या (३१+३२+१) दिनांक ६, ८ व १८ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये बदल्या / पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

- सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे ३, १, २, १ अशा ७ अधिकाऱ्यांच्या बदल्या / प्रत्यावर्तन करण्यात आल्या आहेत. सहसचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे २, १, १ अशा ४ अधिकाऱ्यांच्या बदल्या स्थगित / रद्द करण्यात आल्या. सहसचिव, उपसचिव संवर्गातील अनुक्रमे १, १ अशा २ अधिकाऱ्यांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे. सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे १, १, ३, १ अशा ६ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

- उपसचिव संवर्गातील २ अधिकाऱ्यांना मानीव दिनांक मंजूर करण्यात आले.

- भारतीय प्रशासन सेवेमधील विविध सूचनांबाबतची माहिती (एकूण १० सूचना) http://mahaias.nic.in या वेबसाईटवर Message / Notice Board वर टाकण्यात आले आहेत.

***********